
## द हिडन लाईफ ऑफ ट्रीज

# झाडांच्या अबोल विश्वाचं बोलकं दर्शन

**मूळ लेखक : पीटर वोह्ललेबेन / अनुवाद : गुरुदास नुलकर / मनोविकास प्रकाशन**




फुलांनी डवरलेले वृक्ष, लता सर्वांनाच नेत्र सुखद वाटतात. फळांनी लगडलेले वृक्ष तर मनुष्यप्राण्यासह पक्ष्यांनाही मेजवानीच असते. निसर्ग हा शब्द उच्चारला तरी हिरवेगार डोंगर, काठावर महाकाय वृक्षांचा शेजार घेऊन वाहणारा ओढा–ओहोळ नजरे समोर येतात. प्रत्यक्ष दृष्टीस पडणारी ही वृक्ष राजी जमिनीखालील मुळांच्या आधाराने जमिनीवर भक्कम स्थितीत उभे असतात. वनस्पतीमुळे आणि बुरशीच्या माध्यमातून एकमेकांशी संपर्क साधत असतात. जमिनीखाली बुरशीचे विशाल जाळे असते. सुझान सिमार्ड या संशोधकाने इंजेक्शनचा वापर करून एका बर्च झाडात किरणोत्सर्गी कार्बन सोडला. त्यांना तो कार्बन जवळच्या डग्लसफर या वृक्षामध्ये सापडला. यावरूनअसेलक्षातयेतेकी, जमिनीवरती जरी विविध प्रजातींची झाडं एकमेकांशी स्पर्धा करत असलीतरी त्यांच्या मुळांशी असलेल्या बुरशीचं जाळं मात्र त्यांच्यात तडजोड करण्यासाठी, समन्वय घडवून आणण्यासाठी उत्सुक असतं.

अशा अनेक रोचक प्रयोगांची, निरीक्षणांची माहिती हवी असेल तर 'द हिडन लाईफ ऑफ ट्रीज' हे पुस्तक वाचावयास हवे. मूळ पुस्तक जर्मन भाषेत आहे. त्याचा इंग्रजी भाषेत अनुवाद आहे. या इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा मराठी अनुवाद मनोविकास प्रकाशनातर्फे डिसेंबर २०२२ रोजी प्रकाशित झाला. सिम्बायोसिस सेंटर फॉर क्लायमेट चेंज ॲण्ड सस्टेनेबिलिटी या संस्थेचे प्रमुख, अनर्थशास्त्र आणि शेतापासून ताटापर्यंत या दोन पुस्तकांचे लेखक डॉ. गुरुदास नूलकर यांनी हा अनुवाद केला आहे. गुरुदास नूलकर स्वत: याविषयातील तज्ज्ञ असून लेखकाच्या जात कुळीतील असल्याने पुस्तक वाचताना भाषेचा ओघ, विषयातील प्रभुत्व जाणवते. ज्यांची वनस्पती विश्वाशी जवळीक आहे, जंगलाचे आकर्षण आहे, निसर्ग निरीक्षण करण्याची आवड आहे आणि निसर्गातील रहस्य जाणून घेण्याची उत्सुकता आहे अशा सर्वांनीच हे पुस्तक वाचावयास हवे. केवळ २०० पृष्ठांचे हे पुस्तक असून एकूण ३६ प्रकरणात विषय विस्तार केला आहे. एकेक प्रकरण वाचून झाल्यावर त्यातील माहितीवर विचार करण्याचा कालावधी वाचकाला मिळतो. प्रत्येक प्रकरणाचे शीर्षक अर्थवाही आहे. उदा. झाडांची भाषा, सरकणाऱ्या पाण्याचं गुपित, रमणीय वार्धक्य इ. पुस्तकातील प्रकरणे ही छोटीछोटी, तीन ते चार पृष्ठांची असल्याने वाचनाची आवड आणि निसर्गाचे कुतूहल असणाऱ्या व्यक्तींसाठी हे पुस्तक अवर्णनीय संधी आहे. मूळ पुस्तकाचे लेखक जर्मनीतील असल्याने पुस्तकात ज्या वृक्षांचा उल्लेख आहे ते वृक्ष सर्व वाचकांच्या पाहण्यातील असतील असे नाही. अनेक प्रकरणांमध्ये पाईन, बर्च, फर, स्प्रूस आदी वृक्षांचा उल्लेख आहे. पहिले प्रकरण पूर्ण झाल्यानंतर या वृक्षांची, पानांची चित्रे दिलेली आहेत. या वृक्षांबाबत माहिती पुस्तकात दिलेली आहे, ती वाचताना या चित्रांची मदत होते. मनुष्यास प्राण्यांविषयी माहिती

असते. प्राणीप्रेमीही भरपूर संख्येने आजूबाजूला दिसतात. प्राणी जरी माणसांसारखे बोलू शकत नसले तरी आपल्या हावभावांवरून तेआपल्या मनातील भावना ओळखू शकतात. प्राण्यांच्या ही मनातील भाव माणूस समजावून घेऊ शकतो. संकट आले की सर्व प्राणी पळा किंवा लढा यापैकी सोयीचा निर्णय घेऊ शकतात. वनस्पती मात्र काय करत असतील याची जाणीव आपल्याला असेलच असे नाही. या पुस्तकात वनस्पती कशा प्रकारे इतर वनस्पतींशी संवाद साधत एकमेकांना मदत करतात, वेळप्रसंगी आजारी कमकुवत झाडाला पोषणाचा पुरवठा करतात याचे सविस्तर वर्णन केले आहे. महत्त्वपूर्ण बाब म्हणजे यासाठी प्रयोगांचे संदर्भ सर्वात शेवटी दिले आहेत. मनात आले ते विधान पुस्तकात नाही. लेखकांचे निरीक्षण आहेच त्याच बरोबर सप्रयोग सिद्ध केलेली विधाने संदर्भासह दिलेली आहेत. वैज्ञानिक माहिती सोप्या भाषेत लिहिली आहे. काही सहजतेने करता येतील अशा प्रयोगांचा उल्लेख पुस्तकात आहे.

वनस्पतींना स्मरणशक्ती असते, मेंदू असतो, वनस्पती एकाकी झाल्यानंतर लवकर मृतप्राय होतात, उपयुक्त बुरशी, पक्षी यांच्याशी दोस्ती करून वनस्पती आपला संसार वाढवतात, उपद्रवी कीटकांचे आक्रमण झाले की इतर भाऊबंदांना धोक्याची जाणीव करून देतात, वनस्पतींना तापमानातील बदल, दिवसाच्या लांबीतील बदल समजतो अशा अनेक बाबी वाचून आपण थक्क होऊन जातो.

वनस्पती इतर सजीवांना आवश्यक असा ऑक्सिजन बाहेरसोडत असतात हे आपल्याला शालेय वयापासूनच ठाऊक असते. त्याप्रमाणे झाडांनी नाकारलेला असा एक रंग जो उन्हाची तलखी कमी करणारा असतो अशा हिरव्या रंगाच्या प्रकाश लहरी झाड परावर्तित करत असते याचे विस्तृत विवेचन पुस्तकात आहे. निसर्गात कधीही, काहीही टाकाऊ नसते. अगदी वठलेले, पडलेले झाडही कितीतरी सजीवांसाठी आसरा, अन्नाचा स्रोत असते.

नैसर्गिक जंगल आणि मानव निर्मित जंगल या बाबत जी माहिती पुस्तकात दिलेली आहे ती तर नवीन दृष्टी देणारी आहे. सौंदर्या साठी उद्यानांमध्ये झाडाझुडुपांची कटाई करून त्यांना आपल्याला हवा तसा आकार आपण देतो. परंतु त्याचे त्या वनस्पतींवर काय परिणाम होतील याचा विचारही करतनाही. वनस्पतींची पानगळ आपल्याला कचरा वाटतो परंतु निसर्गासाठी तो उपयोगी जैविक माल असतो. हे पुस्तक वाचल्या नंतर आपला जंगल, निसर्ग यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून जाईल. आपण प्रयत्न पूर्वक वनस्पती, जंगल वाचायला शिकू. अनेक उपद्रवी कीटक तसेच शाकाहारी प्राण्यांचे खाद्य असल्यामुळे नवीन पालवीला असणारा धोका, काही पक्षी खोडामध्येच ढोली तयार करतात, वादळे, हिमवर्षा व यांसारख्या नैसर्गिक आपत्तींना वनस्पती सामोऱ्या जात असतात. कधी जिंकतात तर कधी पराजित होतात. जीव गेला तरी अनेक सूक्ष्मजीवांचे अन्न होतात. निसर्गचक्र अद्भुत आहे. या चक्रात व्यावसायिक कारणासाठी वृक्ष लागवडीसारखे मानवी हस्तक्षेप होऊ लागला की ऱ्हास सुरू होतो. या पुस्तकात जमिनी खालील अंधाऱ्या जगावर प्रकाश टाकला आहे. या प्रकाशात आपण वनस्पतींकडे संवेदनशील नजरेने पहायला शिकूया. माणसांच्या अतिवेगवान जगात वनस्पतींचे संथ आयुष्य समजावून घेऊ या.

इंग्रजी भाषेतील पुस्तकाचे मराठी भाषेत अनुवाद करत असताना व्याकरण दृष्ट्या अयोग्य वाक्य रचना क्वचित आढळतात. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या वनस्पतींकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र या पुस्तकाच्या वाचनाने अधिक विनयशील होतो. एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ या वचनाची आठवण होते.

◆

**– मनीषा चंद्रशेखर पाठक**
aneeshapathak@gmail.com